# राधा माधव

ी. मि. वेलणकर

१९८०
म. ग्रं. सं. ठाणें
य काव्य
क. १९६१



REFBK-0017976
REFBK-0017976

१७८७६

७५३.४५
१८।३।७१
१९९१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम ७५३.४५ वि:
क्रमांक १९९१ नोंद दि १८।३।७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना
१९७०

# राधा-माधव

दा. क.
संग्रह शाखा

प्रकाशक :

© राजीव वेलणकर

राजीवश्री प्रकाशन
इंदिरा निवास, ए. जी. स्ट्रीट,
गिरगाव मुंबई–४

●

प्रथम प्रसिद्धि
२३-८-१९७०

●

मुखपृष्ठ : श्री. बाळ ठाकूर

●

मूल्य रु. ४

●

मुद्रक : श्री. पांडुरंग दाजीबा मोरे,
निर्णयसागर प्रेस,
२६।२८ डॉ. एम्. बी. वेलकर स्ट्रीट, मुंबई २

# राधा-माधव

(संसार गीतें)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८०८९

कवि

श्री. भि. वेलणकर

REFBK-0017976
REFBK-0017976

राजीवश्री प्रकाशन

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| | | | पृष्ठ |
| १ | शुभेच्छा | वि. स. खांडेकर | ५ |
| २ | प्रवेशद्वारीं | श्री. भि. वेलणकर | ८ |
| ३ | उपन्यास | | ११–१२ |
| ४ | राधा–माधव | | १३–४२ |
| ५ | उपसंहार | | ४३–४४ |
| ६ | एक हृद्य आविष्कार ! | महाराष्ट्रकवी यशवंत | ४५ |
| ७ | विनोदी आणि चटककार ! | ग. त्र्यं माडखोलकर | ४८ |
| ८ | स्वातंत्र्यकाळातील संसारदर्शन | श्री. शं. के. कानेटकर (गिरीश) | ४९ |
| ९ | परिशिष्ट १ : कडव्याचा चौथा चरण | | ५० |
| १० | परिशिष्ट २ : टीपा | | ५१ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र
दि:
नोंद दि:

# शुभेच्छा!

श्री. श्री. भि. वेलणकर यांच्या रसिक पांडित्याचा आणि संस्कृत भाषेवरील प्रभुत्वाचा मला प्रथम परिचय झाला तो दहा वर्षांपूर्वी कवि यशवंत यांचा षष्ट्यब्दिपूर्ति समारंभ मुंबईत साजरा झाला तेव्हां. त्यावेळी श्री. वेलणकरांनीं यशवंतांच्या 'जयमंगला' या खंडकाव्याचे सुरस समवृत्त संस्कृत रूपांतर करून रसिक मनांत प्रवेश केला. त्यानंतर लवकरच 'संस्कृत सौभद्र' मी वाचलं आणि पाहिलं. एखाद्या रूपवतीचें आरशांतलं प्रतिबिंब पाहतांना तिची मूळची आकृती अधिक मोहक कीं आरशांतील प्रतिकृति अधिक मोहक असा संभ्रम पडावा तसं हें संस्कृत सौभद्र पाहतांना मला वाटलं. संस्कृतचा व्यासंग आणि त्यांतल्या साहित्याचें परिशीलन हा नारिकेलपाक आहे असें मानण्याचा गेल्या तपा दोन तपांत प्रघात पडला आहे. पण वेलणकरांची ही संस्कृत रचना वाचतांना व ऐकतांना माडावरून नुकत्याच काढलेल्या शहाळ्यातील गोड कातळी आपण खात आहों आणि तिच्या बरोबर अमृतमधुर पाण्याचे घुटके घेत आहो असें वाटल्यावांचून राहात नाहीं.

संस्कृत सौभद्रानें मला असें आकृष्ट केल्यामुळें, वेलणकरांच्या पुढील रचनेकडे मी मोठ्या उत्सुकतेने पहात गेलों. जबाबदारीच्या जागीं असलेल्या व्यक्ती सामान्यतः कार्यव्यापृत असतात. त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं कलाप्रेम, साहित्यभक्ति किंवा विद्याव्यासंग यांचे अंकुर असले तरी दैनंदिन व्यवहाराच्या रूक्ष सहारांत ते करपून जातात, असा सर्वसामान्य अनुभव आहे. मात्र जिचा महाराष्ट्रानें सदैव अभिमान बाळगावा अशी या नियमाला अपवाद असलेली परंपरा गेलें शतकभर आपल्याकडे प्रचलित आहे. न्या. रानडे व लो. टिळक हे या परंपरेचे मूळ पुरुष म्हणतां येतील. श्री. वेलणकर हे याच परंपरेंतले एक उल्लेखनीय प्रतिनिधि आहेत. व्यावहारिक कामाच्या रगाड्यांतून आपल्या आवडत्या छंदासाठी सवड काढून त्यांनी खंडकाव्य, गीतनाट्य, नभोनाट्य आणि नाट्यरचना अशा प्रकारची विपुल संस्कृत साहित्यनिर्मिती केली आहे. ती पाहून माझ्या मनांत येई, कीं त्यांच्यासारख्या रसिक पंडितांनी संस्कृत प्रमाणे मातृभाषेची सेवा कां करू नये? माणसाला आपली आजी प्रिय असते हे खरे आहे पण त्याचा अर्थ आई नावडती असा नाही.

श्री. वेलणकर मराठींत लिहीत नाहींत म्हणून माझ्या मनाला वाटणारी रुखरुख 'राधामाधव' या त्यांच्या प्रस्तुत काव्यसंग्रहाने दूर केली. तीस कवनांचा हा गुच्छ आहे. नांवावरून त्याचें अंतरंग पौराणिक आहे असें वाटले तरी त्यांत कृष्ण सख्याची गाणी नाहीत. ती सारी कवनें सामाजिक निरीक्षणांतून निर्माण झाली आहेत. त्यांत आजकालची संसार-चित्रे चित्रित करण्याचा कवीनें प्रयत्न केला आहे. स्त्री आणि पुरुष यांचें परस्परांविषयींचें आकर्षण आणि सहजीवन हा अनादि कालापासून काव्याचा विषय झाला असून, अनंत काल तो तसाच रहाणार आहे. वेलणकरांनीं राधा हे या सनातन स्त्रीचें प्रतीक आणि माधव हे या सनातन पुरुषाचं प्रतीक मानून,

आजच्या सर्वसामान्य संसारांत त्यांची जीं विविध रूपं दिसतात तीं कधी खेळकरपणानं तर कधी अंतर्मुख होऊन चित्रित केली आहेत. विविध सामाजिक स्तरांतल्या भिन्न भिन्न स्वभावाच्या आणि नानाविध भावभावना व विचारविकार यांनी सीमित केलेल्या दांपत्यजीवनाचे या कवनांत वर्णन आले आहे. त्यामुळे प्रत्येक कवनांतल्या राधामाधवांचे अनुभव निराळे असूनही एका आंतरिक भावसूत्राने ही सर्व कवने निगडित झाली आहेत. ही कवने केवळ त्या त्या स्तरांतल्या परिस्थितीतल्या जीवनाचं नुसतं चित्रण करीत नाहींत. एकंदर दांपत्यजीवनाविषयीच आपल्याला विचार करायला लावतात.

उपसंहारांत कवि म्हणतो–

मर्म खरे संसारसुखाचे
कुठे दडविले कुणि केव्हांचे
कसं कोठुनी हाति यायचे
राधा माधव शोधिती !

कवीला पडलेलें हें कोडें, हा संसारसुखाचा शोध सर्वकाळी सर्वस्थळीं विचारवंतांना बेचैन करीत आला आहे. प्रेमकलहानें संसाराला लज्जत येते असं म्हणतात तें थोडेसें खरं असलं तरी अनेक ठिकाणीं प्रेमकलहापेक्षां कलह–प्रेमच पतिपत्नीच्या सहजीवनावर ताबा चालवीत असलेले दिसते. बाह्यतः सुखी वाटणारे अनेक संसार आंतून अगदीं शुष्क, अगदीं नीरस असतात. त्यांत निर्जीवताच अधिक आढळून येते. अशा संसारांत वारंवार विसंवादाचें दर्शन घडत राहतें किंवा भावजीवन कोमेजून जातें. याचें मुख्य कारण संसारसुखाविषयींच्या अतिरिक्त स्वप्नाळू कल्पना उराशीं धरून मनुष्य दांपत्यजीवनाची वाटचाल करूं लागतो. आपल्या जोडीदाराची कुवत न ओळखतां त्याच्याकडून गुणसंपन्नतेची अपेक्षा करतो. इतकेंच नव्हे तर शरीरसुख आणि मनःशांति, क्षणैक सुख (Pleasure) आणि चिरकालिक आनंद (Happiness) यांच्यातलं अंतर जाणून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न तो सहसा करीत नाहीं. माणसाला पुष्कळदां आंधळ्या आणि लहरी नियतीच्या तालावर नाचावं लागतं. नियति कांही नेहमी कुणासाठी फुलांच्या पायघड्या घालून ठेवीत नाही. उलट अनेकदां माणसाच्या जीवनमार्गावर कांटेकुटे पसरण्यांतच तिला आनंद वाटतो. शिवाय मनुष्य एक गोष्ट नेहमीच विसरतो ती म्हणजे दुसऱ्याला देण्याजोगी, प्रेम ही एकच गोष्ट आपल्या हातीं असते. मात्र त्या प्रेमाची परत फेड होणें किंवा दुसऱ्याकडून निरपेक्ष प्रेम मिळणे हा शेवटीं केवळ सुदैवाचा भाग असतो. हें संसारविषयक तत्त्वज्ञान खरं असलं तरी जिथं साठी सत्तरीच्या घरांत आलेल्या आणि तीनचार तपं सहजीवन जगलेल्या वृद्धांनाही ते नीट उमगत नाहीं तिथं तारुण्याचा उंबरठा नुकत्याच ओलांडलेल्या आणि स्वप्नाळू डोळ्यांनी सुखपूर्ण भविष्याची रम्य स्वप्नं पाहणाऱ्या तरुणांना ते कुठून प्रतीत होणार ?

या कवनगुच्छांचा विषय अशा रीतीनें वाचकाला किंचित् अंतर्मुख बनवणारा असला तरी त्यांतल्या कवनांत कवीनें अनेक ठिकाणीं खेळकरपणाचा आश्रय केला आहे.

आजच्या दांपत्यजीवनांतली दु:खें, त्रटी आणि विसंगति एखाद्या नाविन्यपूर्ण तंत्राचा अवलंब करून कुणा कादंबरीकारानें रेखाटावयाचें ठरविलें तर ती कादंबरी जेवढी रंजक तेवढीच उद्‌बोधक होईल यांत शंका नाहीं, असा विचार हीं कवनं वाचतांना माझ्या मनांत येऊन गेला, तो त्याच्या मुळाशीं असलेल्या लेखकाच्या सामाजिक निरीक्षणामुळें.

श्री. वेलणकरांचें संस्कृत भाषेवर प्रभुत्व असलें तरी या पुस्तकांत कुठेंही क्लिष्टता किंवा दुर्बोधता आढळणार नाही. कवनांच्या बौद्धिक रंजकतेंत भर घालणाऱ्या कल्पनापैकीं वानगी म्हणून दोन तीन इथें देतों.

अ

शरद्वृष्टि नसे हिमवृष्टी ही
शाल पांढरी पांघरी मही

आ

सूर्यकांत मी दर्शनिं झरतें
चंद्रकांत मणि तुला वांछितें
इंद्रधनूंतच तव मन रमतें

इ

कांहिं पाहिलें कांहिं राहिलें
कांहिं साहिलें कांहिं दाहिलें
कांहिं चाहिलें कांहिं वाहिलें.

विषय, रचना आणि अभिव्यक्ती या दृष्टींनी हा कवनगुच्छ वाचतांना मला प्रख्यात इंग्रज कवि पोप यांच्या इंग्रजी कवितेची आणि माधव जूलियन यांच्या सुधारक खंडकाव्याची आठवण झाली. गद्यप्राय पद्यरचना हा सामान्यतः काव्याला फारसा उपकारक गुण नव्हे. राधामाधवमध्यें त्याचा आढळ होतो. पोप आणि माधव जूलियन यांनी त्याचा समर्थपणें उपयोग केला आहे. त्यामुळेंच त्यांची नांवें या संदर्भात मला आठवली असावीत.

श्री. वेलणकर यांच्या मराठी साहित्यातल्या प्रथम पदार्पणाचें वाचकांकडून योग्य तें कौतुक होईलच. त्यांच्या ठिकाणीं रसिकता, पांडित्य, साहित्यभक्ति आणि विविध अनुभव घेण्याची शक्ति या गोष्टी एकवटल्या आहेत. या सर्व गुणांचा अधिक सखोल, अधिक उत्कट व अधिक कलात्मक असा आविष्कार त्यांच्या पुढल्या मराठी कृतींत प्रगट होवो असे मी मनःपूर्वक इच्छितो.

कोल्हापूर
५-८-१९७०

वि. स. खांडेकर

# प्रवेशद्वारीं

मराठी वाङ्मयमंदिरांत ग्रंथ-प्रकाशन करून लेखक म्हणून मी प्रथमच प्रवेश करीत आहे. अजूनपर्यंत केवळ संस्कृत लेखन ग्रंथरूपानें प्रकाशित झालें. मराठी लिहिलें, कांही नाटकें रंगमंचावर आलीं, कवितांचें वाचन केलें पण मुद्रित प्रकाशन अजून केलें नव्हतें. क्वचित नियतकालिकांतून मित्रांच्या वा गुरुजनांच्या भिडेखातर कांहीं लेखन स्फुट रीतीनें प्रसिद्ध झालें. आज राजीवश्री प्रकाशनाचे प्रथम पुष्प म्हणून हा काव्यसंग्रह रसिकांपुढे ठेवीत आहे.

मराठी कविता मी प्रथम वयाच्या दहाव्या वर्षाचे आसपास लिहिली; संस्कृत कविता तेरावे वर्षी. पण प्रकाशनात संस्कृतने आघाडी मारली आणि फुटकळ लिखाण सोडून सतरा रचना संस्कृत ग्रंथरूपाने प्रकाशित झाल्या. त्यांतील कवनांचे चरण सहज पाच हजाराहून अधिक असतील. नाटकातील गद्य निराळेच. तरीहि आज प्रथम मराठी प्रकाशन करतांना थोडी धाकधूक वाटतेच आहे. श्री. वि. स. खांडेकर, महाराष्ट्र-कवी यशवंत, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व कवी गिरीश यांच्या उत्तेजनानेंही मन साशंकच आहे. कारण या नामवंतांनी निवळ सौहार्दच तर प्रकट केलें नसेल ना असें वाटतेंच.

याला कारणेंही माझ्या दृष्टीनें बलवत्तर आहेत. विषय पतिपत्नीसंबंधाचा— सनातनच पण ठराविक चाकोरीतून न हाताळलेला. नवमताच्या पुरस्कर्त्यांना पसंत पडण्यासारखीहि शब्दसंहती त्यांत असली तरी तालवृत्त आणि यमक यामुळें त्यांची नाराजी संभाव्य. शिवाय पतिनिष्ठेसारखी त्यांना जुनाट व टाकाऊ वाटणारी मूल्येही आवर्जून नवमतांबरोबर मांडलेलीं. जुन्याच्या अभिमान्यांना तर हौशी राधेसारखे विचारही वर्ज्यच आणि त्यांचें वाङ्मयात प्रदर्शन तर तिडीक उठवणारें. मग लख धार राधेचें विचारायलाच नको. आणि ज्या शिक्षण आणि संस्कृतीच्या थरांतली ही चित्रे मानावीत, ती वापरतील तीच व्यवहारी भाषा कवितेत आणण्याचा केलेला धाडसी प्रयत्न. यामुळे कोणाच्या आंठ्या दिसतील आणि कोणाच्या मिठ्या बसतील याबद्दल साशंकता स्वाभाविकच नव्हे का ?

राधामाधव या नांवावरच कांहीं आक्षेप. त्यांत कृष्णाच्या लीला नसल्यामुळें कांहीं चाहत्यांची तर निराशाच झाली. पण मी देव मंदिरांत शोधीत नाहीं. जनता जनार्दन हा शब्दप्रयोग अतिपरिचयात् अवज्ञास्वरूप होण्याच्या मार्गात असला तरी मी अजून आपले मानव बांधव हेच देवाची स्वरूपें असावीत असा भाव राखणारा.

यामुळें या संसारी जोडप्यांनाच मी राधामाधव मानलें आहे. कृष्ण आज देवपण पावला असला तरी एका काळी पृथ्वीवर वावरणारा तो संसारी पुरुष होता, ही कल्पना ( म्हणजे सत्य ! ) कांहींना असह्य–अशक्य वाटत असली तरी तीच खरी आहे, हे मला पटते आणि माणसाचाच देव होतो–मग त्याकरितांच देवाचा माणूस अवतार होतो असे विधान सोईनें केलें तरी—हेंच मानून चालणें पटतें. तेव्हा ही राधामाधव तुमच्या माझ्यासारखीच आहेत. त्यांची आजची मतें-मानितें अशीच विविध आहेत व ती प्रकट करण्याची त्यांची भाषा ही तितकीच बहुविध पण घरगुती आहे.

सुख मिळण्यासाठीं आणि दुःख टाळण्यासाठी माणसाची धडपड नेहमीच चालू असते. पण एकाचे अन्न ते दुसऱ्याचे विष या इंग्रजीतल्या म्हणीप्रमाणें सुख कोणचें याबद्दल परस्पर विरुद्ध एकांतिक मतें असूं शकतात. शिवाय दुःखाला ( आणि सुखालाहि ) परिस्थिति किंवा दैव कितपत कारणीभूत आणि स्वतःचें कर्तृत्व ( किंवा अकर्तृत्व ) किती प्रमाणांत निमित्त ठरते याविषयी प्रत्येकाची भूमिका नि दृष्टी वेगवेगळी राहते. आत्मनिरीक्षणाचे अभावी अन्यत्र दोषारोपण करून स्वतः नामानिराळे रहाण्याची प्रवृत्तीच विशेष. या संग्रहातील राधा आणि माधव ही अशीच सामान्य माणसें आहेत. त्यांत दोष कुणाचाहि वाचकांनी ठरवला तरी दुष्ट कोणी नाही हे मान्य होईल. कविप्रणीत अतिरंजितता सोडली तर वैचारिक प्रदर्शनात अवास्तवतेचा दोषही दिसणार नाही. ही चित्रें केवळ कल्पनेतली नव्हेत—सुख मानणारी वा दोष देणारी. परिस्थितिजन्य दुःखातही मनुष्य सुख कसे शोधतो याचीही उदाहरणें या चित्रावलींत प्रतिबिंबित झाली आहेत. अर्थात जीवनाचे हे नमुने केवळ वानगीदाखल आहेत. जीवनसिंधु विशाल आहे. त्यांतील कांही बिन्दू मात्र सूक्ष्मदर्शक यंत्राखाली ठेवले आहेत.

ही संसारगीते अभिनेय आहेत. प्रत्येकांत म्हणण्याचा आवाज महत्त्वाचा आहे; कुठे आर्जव आहे तर कुठे उपहास आहे. कुठे मग्रूरी आहे तर कुठे लीनता आहे. या प्रत्येकाचा एक विशिष्ट आवाज आहे— एक पार्श्वभाव ( mood ) आहे — एक जोष आहे. – त्यातच योजलेल्या शब्दप्रणालीचे सार्थक आहे; नाहीतर काव्यातली भाषा काव्यमय नाही असा विरोधच कोणाला प्रतीत होईल. जुन्या नव्यांचे या बाबतीत मतभेद अपरिहार्य आहेत. गीत योग्य तऱ्हेने म्हटल्यावर शब्दयोजना बहुधा अधिक अर्थवाही भासेल.

ही एकपात्री गेय भाषणें ( monologues ) आहेत. त्यांत प्रत्येक संसाराचे चित्र स्पष्ट दिसावे. काही भाषणे माधवाची आहेत; बरीचशी राधेची निवेदनें आहेत. कवीची स्वतः केलेली संसार निरूपणे आहेत, ९, १०, २२, २३ या गीतांत. गीत २७ हे एका बाहेरील व्यक्तीचे असून त्यांत राधामाधवांच्या संसा-

राचे मूल्यमापन या तृतीय-नेत्रांतून आहे. गीतांना विशिष्ट अनुक्रम अभिप्रेत नाही. फारच झाले तर संसाराचा प्रारंभ गीत एक प्रमाणें आणि सायंकाल गीत ३० प्रमाणे असू शकेल.

क्वचित त्याच भावनेची पुनरुक्ति आहे असे वाटेल, ती पूर्वनियोजित आहे. भिन्न प्रकृतीच्या सांसारिकांत काही इच्छा आकांक्षा साधारण असतात व त्या त्या संदर्भांत त्या सुसूत्र असतात हेही चित्रण अपेक्षित आहे. प्रत्येक गीतांचा शेवट वैशिष्ट्यपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. चित्तचित्रणाचा रंग त्याने स्पष्ट व्हावा.

वापरलेले शब्द शुद्ध मराठी आहेत असें नाहीं. त्या त्या व्यक्तीच्या बोलण्याच्या पद्धतीवर तें अवलंबून आहे.

सर्वत्र १६ मात्रांचा पादाकुलक चरण वापरला आहे. कडव्याची सुरुवात गेयतेला अनुकूल अशी आहे. अर्थात् मात्रा कमी आहेत व दोन्ही चरण जोडून म्हणावयाचे आहेत. कडव्यांच्या चौथ्या चरणांत भिन्नता आहे. ती मनीषित आहे. त्या संबधीं एक स्वतंत्र परिशिष्ट जोडलें आहे. सर्व गीतें सारख्याच लांबीचीं अर्थात् २२ चरणांचीं आहेत.

श्री. वा. रा. ढवळे यांनी पुस्तक प्रकाशांत आणण्यास हरप्रकारें साह्य केलें. श्री. खांडेकर, श्री. यशवंत, श्री. प्रा. शं. के. कानेटकर (गिरीश) व श्री. माडखोलकर यांनी अशुद्ध मुद्रिनें अतिशय अल्पकाळांत वाचून गौरवाचे शब्द लिहिले याबद्दल या सर्वांचा मी ऋणी आहें.

निर्णयसागर मुद्रणालयानें थोड्या वेळांत पुस्तक छापून दिलें व राजीवश्री प्रकाशनानें प्रकाशन अंगावर घेतलें याकरिता त्यांचे आभार मानणें अवश्य आहे.

शेवटीं हीं संसारचित्रें वाचकाला सहास्य मुद्रेनें अंतर्मुख करोत हीच इच्छा.

मुंबई. १५-८-७०

श्री. भि. वेलणकर

ग्रं. क्र. १८८८६

उपन्यास

चला पाहु या घरोघरीं
राधा माधव संसारीं !

कोठें रेषा दोन समांतर
सरळ दिशेनें कापित अंतर
अभंग ठेविति अपुलें अंतर
जाणीव न दुसरी तिसरी !

कुठें एककेन्द्रीय वर्तुळें,
वळुनि वळुनि भेटणें न जमलें
पुन्हा पडति तेथेंच पाउलें
पंढरीस वारी गजरी.

चौकोनी वा दोन त्रिकोण,
सम बाजूचा झाला कर्ण,
विषम भुजा राहिल्या विकीर्ण
युती विसंगत रीत तरी!

एकरूपशा आकृति समभुज,
अमित जीवनीं बहुत न समज
कशास क्रंदन कशास कुजबुज
वृथैव तक्रारी न करी.

रसिकपणे पाहुनी स्वाकृती,
दुसरी पूरक बनवा स्वकृती
सोडविण्या कोडें हे गणिती
अगणित नरनारी अपुरी !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........
संदर्भ शाखा

राधा तूं गवळण
माधव जणुं गवळी सजण !

नाही यमुना नाही गोकुळ,
कृष्ण नसे मी तैसा अवखळ,
हृदय तुझे परि लाभुन प्रेमळ
होत घराचें कुंजवन !

वेणुनाद जरि न पडे श्रवणीं
तव चरणांचा रव ये कर्णीं,
आणि घुमविते हृदयकोंदणीं-
प्रेमळ वाणी पैंजण.

नकोच गोपाळांचा मेळा,
भेटता तुला वेळोवेळां,
हंसू मोकळें खेळतां गळां
गोळा हो पंच प्राण.

नकोत गोपी दहि दुध लोणी
कलियामर्दन न करो कोणी,
असतां तुझिया मिठींत राणी
देहा ये बेभानपण.

जाण्यावेळीं हळूच जा पण
नको चाळवूं दुःखाचा कण,
युगसम होइल एक एक क्षण
जीवन होइल गे मरण !

## २.

तूं राधा विरहिणी
ज़ातां माधव दूर रणीं !

नसे द्वारका नसतीं यादव,
नसे माधवा सारथिगौरव,
रणभूमीचें नच तें वैभव,
केवळ हृदया ही झुरणी !

रथ नसती वा धनुष्यबाण,
धर्मयुद्ध ना जाणी कोण,
लढण्याविण गे येई मरण
दैवाची अवचित करणी !

शरवृष्टि नसे, हिमवृष्टी ही,
शाल पांढरी पांघरी मही,
नसे तिला जीवन लवभरही
तुझ्या स्मृतीची मज स्मरणी !

अज्ञात स्थळिं अम्ही राहणें,
जगावयाचे अज्ञात जिणे,
अज्ञातच गे राहूं मरणें
अज्ञात तरूं वैतरणी !

कुठेही पडो देह आमुचा,
राहिल तेथें भारत साचा
दाह करुनिया रिपु-धरणीचा
प्रेमे हंसु दे चांदणी !

## ३.

राधा तूं हांसरी
सुखी हा माधव शेतकरी !

उठुनि पहांटे सडा घालितां,
ओवी मंजुळ स्वरिं आळवितां,
झोंप आळशी मज जागवितां
प्रभात भरि माधुरी !

धार काढुनी जातां शेतां,
बैलें माझी साथी होतां,
हातीं धरिला नांगर घुसतां
भूमीच्या अंतरीं.

देव कासराभर वर चढतां,
दिससि न्याहरी घेउन येतां,
तहान लागुनि भूक हरपतां
प्रीत करी चातुरी.

दाणे गाळुनियां घामाचे,
थवे उभवितां या कणसांचे,
उडव्या रचितां हृदयचि नाचे
अभिमान भरे उरीं.

सांजपारिं दिसुं लागती घरें,
किलबिलती किति गोड पांखरें,
भिडतां डोळे तुझे भिरभिरे
स्वर्ग दिसे भूवरी !

## ४

राधा तूं नाचरी
माधवा करणें परि चाकरी

ऋतूगणिक कां नवीन चप्पल,
प्रतिमासी कां नवेंच पातळ,
हरदिनीं कसा नवशृंगार
किति या व्हाव्या परी.

प्रदर्शनांना कशास जाणें,
प्रदर्शन कशाचें मी नेणें,
अंगावरती नवीन लेणें
कुठून पुरवूं तरी ?

केसांचा कां उभार डोंगर,
गळा मोकळा तसाच ऊर,
लाल लाज गालांवरि चूर
भृकुटिभंग मति हरी.

हातिं सदा विणण्याची लोकर,
घरीं न पण होतसे अवसर,
अंगीं माझ्या गरम लक्तर
हौस कशाची खरी ?

वरिष्ठांपुढें घेतां नमतें,
स्वप्न नेहमीं मनांत रमतें,
तयापुढे जरि नेण्या जमतें
तुला एकदां तरी.

## ५.

राधा मी नवनटी
माधवा घालुं नको या अटी.

चित्रण चाले वेळिं अवेळीं,
दिग्दर्शक सोडिना मोकळी,
बसूं कशी रे मी तुजजवळी
प्रेमीं न मी चोरटी.

सहचरांसवें हवें जायला,
दिग्दर्शकही खूष व्हायला,
करावया लागते किति मला
होऊं नको रानटी.

तुला नटीचा नवरा म्हणती,
कशास करणें त्याची खंती,
कितीक दुसरे असेच असती
व्हाया नको हिंपुटी.

घरीं आणतां मिळवुन पैसा,
हर्ष तयाचा होतो कैसा,
मग कां छळिसी मजसी ऐसा
कैशी अशी राहटी.

घरि राहुनि मी माता होउन
मुले खेळवित जरि बैसेन,
तुला नकोशी क्षणांत होइन
कां त्या पडूं संकटी ?

राधा लख धार
माधवा ! राहि खबरदार

विवाह म्हणजे नव्हे शृंखला,
बद्ध नव्हे मी ; मार्ग मोकळा,
कोणी कांहि कसेंही बकला—
नाही बघणार.

स्वयंपाक मी नित्य करावा,
आणि यथास्थित तुज वाढावा,
उरला सुरला नंतर खावा—
नाही जमणार.

घरांत डांबुन नाहिं राहणें,
मावळतीला न घरी येणे,
कधीं कुणाची वाट न बघणे
कसला न करार.

मातृत्वाची मज न थोरवी,
वांझपणाची खंतच फसवी,
संभाळुनि ये जवळ जर हवी
गय ना करणार.

आधुनिक तुझी माधव ! राधा,
नाही तिजला पुराणबाधा,
तुटेल पटकन अखंड सांधा
नकोच अविचार.

## ७.

राधा मी तापट
माधवा फारच तूं लंपट

पत्नीला का शरीर केवळ,
कां न मनि तुझ्या प्रीती निर्मळ,
दुरून दिसु दे दर्शन प्रेमळ
तेच तुला दुर्घट.

गाल पहा हे होति हुळहुळे,
ओंठ विवळती लुळे पांगळे,
पदराखाली दुःख ओघळे
तरी पुन्हा कटकट.

दृष्टि सदा कां आसुसलेली,
वृत्ति तशी ही वखवखलेली,
वासना वसे बळावलेली
कसले हे घुंगट ?

नवे नवे प्रणयाचे चाळे,
हवे कशाला रंग निराळे,
त्यांत कसें रे मन घोटाळे
लागतसे चुटपुट ?

होसि कसा रे हिरमुसलेला,
बसु नको असा तूं रुसलेला,
जिंकसी असा पुन्हा प्रियेला
विसरी ही वटवट.

## ८.

राधा ही दुर्बळ
माधवा केवळ मी अडगळ.

तुला देखुनी सशक्त सुंदर,
मोह जाहला मना अनावर,
केली रे किति प्रीति तुझ्यावर
तव जीवन निष्फळ.

तुला वाटते सहलिस जावे,
निर्मळ जळि खूपच पोहावे,
मर्दपणाने जगी जगावे
मज सोसेना कळ.

कमलनाल मी सुबक नाजुक,
निवडोनि मला चित्तोन्मादक,
फसलास सख्या कां हकनाक
हृदय तुटे तिळतिळ.

करुं दे तुजवर प्रीती कोणी,
आनंदी ठेवो तुज तरुणी,
सरेन एकीकडे शहाणी
उरेल मनि खळबळ.

केलिस सेवा सर्व आजवर,
मनास आतां असह्य भार,
गांठ भरारी अनंत अंबर
ये मजसी भोंवळ.

दा. क्र. १८२८५

९

राधा प्रेमी पडे
तिला पण माधव नच सापडे।

वाचुनि नकली नाटकि नायक,
प्रेमा राणी बनली लायक,
परी दिसेना एकहि पाइक
काय तरी सांकडे

चित्रपटांतुनि नायक शंभर
वेळेवर जिंकिण्यासि तत्पर,
वाट पहाते जरि ही आतुर
न दिसे कुणि फांकडे.

जरी मांडिले उघड स्वयंवर,
पण जिंकाया न ये कुणी वर,
हवा दिखाऊ नकली गळसर
स्वप्न सर्वथा नडे !

अशीच राहिल काय फटिंग ?
की पकडोनी कुणि झोटिंग,
बांधिल गुडघ्याला बाशिंग
अन् डोळां झांपडे.

अजाण वणवा प्रणयि पेटतां,
ये न समाजा जरी शमवितां,
हुरहुर कां लागे कधि पडतां
पाउल ते वांकडे ?

# १०.

राधा परिचारिका
माधवाची ऐका जीविका.

उठुनी आळस देत सकाळीं,
रात्रीची तो संपुन पाळी,
तांबर नयनीं भकास भाळी
दारि मारि हांका.

"आधण चुलिवर ठेवा तोंवर,
तोंड धुवोनी येते सत्वर,
बनवुनी चहा पिउं या प्रियकर"
प्रीतीचा डंका.

"पाव ठेविला रात्रीचा मी,
लोणचे सवे घ्यावे नामी,
आज जेवणें भोजनधामीं
शिरि माझ्या ठणका."

सायंकाळीं घरास येतां,
दारिं निमंत्रण "बाई! चलतां?",
'केस' कठिण कशि तरी निभवितां
टाळा हो धोका.

माधव संसारी तळमळतो,
ओलावा चहुंकडे शोधतो,
राधेचाही जीव ओढतो
प्रसंग पण बांका!

राधा तव जाळी
सांपडे माधव हा कोळी.

सांजसकाळी धरिता रांपण,
समिंदरा भरतीहि उधाण,
टिपत म्हावरे उडतां टणटण
घर येई जवळी.

काठावरती उभी पाहिली,
पोटरी पिळाची ती दिसली,
माशावाणी नजरि हेरिली
मूर्ति तुझी भोळी.

अवचित होतां केव्हां वादळ,
धावुनि आधी सये लावशिल,
मरिआईला वरडुनि कौल
देखुनि आभाळी.

जत्रेला तुज घेउन जाता,
अंबाईला नवस बोलता,
भरीन ओटी पोर खेळता
फिरविन मी झोळी.

तू तर माझी गे मासोळी,
बाजारी जाता काचोळी,
तंगते तरी परतुन वेळी
ये अपुल्याच जळी.

## १२.

राधा मी संशयी
छेडि मज प्रीती ही माधवी !

दुसऱ्या दिसतां कोणी बाया,
रसवंती लागते झराया,
अंतर माझें जळतें राया
हर्षचि तव हृदयीं.

मजशि बोलतां लगीनघाई,
तुसडेपण येते लवलाहीं,
बोलाया तुज नसतें कांहीं
वचन सर्व अव्ययी.

उशीर करिसी येण्या सदनीं,
निमित्त सांगुनि कसा प्रतिदिनीं,
कोण गांठिते तुजसि कोठुनी
कोण सखी विजयी ?

भेटी घेशी कुठें कुणाच्या ?
भेटी देशी कुणा कशाच्या ?
साहुं कशी यातना मनाच्या ?
सांपडल्यें प्रळयीं.

तरी तुझ्याविण मला गमेना,
जवळुनि दुरुनी देशि वेदना,
प्रेम मागुनी प्रेम मिळेना
सत्य हेंच प्रत्ययी.

१३

राधा मी सेविका
माधवा वेळ न घेई फुका.

संमेलनि दंगती अंगना,
हस्तकुशलता जमविति नाना,
जमतिल महिला हो प्रदर्शना
तरि मज ना रोखा.

सर्व व्हायचे अजुनि प्रसाधन
नटणे सुंदर दहाजणींहुन,
काय पहाता डोळे फाडुन
अडवू वाट नका.

आज रात्रिला होइल नाटक,
तालमिंच्या कष्टाचे सार्थक,
करा काहि पत्नीचे कौतुक
स्मित ना माहित मुखा.

मोठ्या घरची जमति माणसे,
म्हणति त्यांत मी शोभुनी दिसे,
याहुनि व्हावे काय छानसे
लहान हा लाभ का ?

समाजसेवा न का पाहवे,
पत्नीजीवित का पतिसेवे,
वाटते स्वतां कांहिं करावें
माफ करा मज चुका.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
ग्रंथ संग्रहालय ठाणे

## १४.

राधा मी माता
माधवा ! केवळ निर्माता

ओझें ज्यांचें मी साहियलें,
ओझें त्यांचें तुला जाहलें,
आज जणों तू प्रथम जाणले
या संसाररथा.

चिमण्यांची या भूक शमाया,
हौस कांहि त्यांची पुरवाया,
त्यांना पायीं उभे कराया
हात लाव आतां.

प्रणयाची स्वप्नें जरि लोभस,
फळें न का हीं जागृत गोंडस,
होउनि आतां पुरता डोळस
घेइं भार माथां.

प्रणयांतुनि रे प्रेम फुलावें,
कमळ कर्दमीं जैं डोलावें,
पोरांसाठीं हृदय हलावें,
व्यर्थ प्रेमगाथा !

शक्ती माझी किति पुरणार,
पाय घरांतुनि ना निघणार,
तेथून पुढें तू नेणार
आशा ही चित्ता.

## १५.

राधा मी हौशी
माधवा तू पडलास फशीं.

ताजा गजरा धुंद रुळावा,
सुगंध अंगावरि पसरावा,
डामडौल चौघींत दिसावा
ही तर माझी खुषी.

सदा सिनेमा नवा पहावा;
चप्पलजोड नवा चपकावा,
कर्णभूषणीं हिरा डुलावा
सोनें बावनकशी.

नवीन वसनीं मोहक दिसतें,
केशविरचनी नव्या रंगतें,
रंगोटी वदनींहि खुलवितें
स्वप्न जणूं धाडशी !

गांव नवनवे मी हिंडावे,
मोटारींतच जीव सुखावे,
सहजच्च जमती सोबती नवे
जगुं मी ह्याविण कशी ?

पिटूं नको नांवाचा डंका,
टाळतें सदा अशुभ कलंका,
तुझीच रे मी ! कशास शंका ?
पण उलटूं दे तिशी !

राधा मी सहचरी
माधवा तू तर अधिकारी.

तुझ्याएवढी शिकू न शकले,
तरी सहचरी मला निवडिले,
मन माझेही तुजवरि जडले
कां हमरी तुमरी ?

तुला वाटते मला न समजे,
तुला सांगण्या मीही न धजे,
पायघडी करु देह हा सजे
का त्या तू ठोकरी ?

तनु-मनावरी अधिकार तुझा,
नाही पण का तसाच माझा ?
नको कशाचा गाजावाजा
प्रीति वसो अंतरी.

हाति धरुनि ने तुझ्या संगती
लाज कशाची रमता प्रीती,
पराक्रमा न पुरो तव धरती
कर राहू दे करी.

सुख तुला जरी मी जावोनी,
उडून जाइन, छाया गगनीं
मायेची तुजवरती धरुनी
होईन सुखी खरी.

## १७

राधा तुज ठाउक
नाहिं का माधव संपादक !

फुकट वाचुनी कितिक दैनिकें,
शिवराळ तशीहि साप्ताहिकें,
जमवुनि तैशी कुठुनि शीर्षकें
वृत्त बनवि घाउक.

मत बनवावे कशाहि विषयीं,
टीका झोकीं कोणाविषयीं,
कविहुन गति मम अगम्य पायी
सत्याचा पाइक.

जाहिरातिचा घेउनि मलिदा,
भलावणीचा काढुनि कशिदा,
अपूर्वतेच्या देऊं सनदा
वचकति मज लेखक.

मागु नको परि सदैव पैसा,
कुठून आणू तुला पुरेसा,
सदा संपतो सारा कैसा
होउं नको खर्चिक.

खुर्चीवरि जरि विराजमान,
डळमळणारे आहे आसन,
खप न वाढता देइल काढुन
दयाळु ना मालक.

## १८

राधा विद्यार्थिनी
माधवा खेळ खेळ जपुनी.

वर्ग सुटे तो दिसशि तू उभा,
कशी मिळाली तुजसि ही मुभा,
लांब सोडिती मैत्रिणी जिभा
ज़ाते मी शरमुनी.

सिनेमास जाता तुजसंगे,
घरि आईला खोटे सांगे,
कुणि अंधारी खांकरि मागे
तनु येत शहारुनी.

तू न मिळविता, कुठून पैसा
आणिसि प्रतिदिनि, खुळखुळत खिसा,
भासतोस तू मज उधळासा
काय पुढे जीवनी ?

परीक्षेत यश मिळुं दे मजला,
रोजगार लागूं दे तुजला,
मग आहेच तुझ्या जोडीला
अधीर का होउनी ?

नाही अजुनी बनलेली मी
ताणुन धरितां तुटेन प्रेमी,
दोघांना मग दुःख नेहमी
दुखिं जन्म कंठुनी ?

तूं राधा राणी
माधव हा साधा वाणी.

जिरें खोबरें हिंग तोलता,
काटा थोडा अधिकच झुकता;
हृदयी कांही तरि धडधडता
स्मरते तव मूर्ती रमणी.

रद्दी घेउन येति किती जण,
एक न कागद वजनि अधिक पण,
भावासाठीं करिती भांडण
सर्वहि अर्पण तव चरणी.

दुर्मिळ वस्तू मी विकतांना,
काळा दर लावितो म्हणति ना!
पैसा रोख कुणी देईना
करणें मज मग उगराणी.

नोकर दावित सदा कायदा,
म्हणती घेतों फार फायदा,
कामचुकारी सर्व बयादा
उठविति जिन्नस क्षणोक्षणी.

खर्च मात्र तू कमी जरा कर,
नको रोज गे तेल पावडर,
कशास भाजी दर पानावर,
मढवीन तुला विभूषणीं.

राधा नच आचरी
माधवा विसरुनि निज पायरी.

तुला लाभले स्वरूप गोंडस
मूर्ति दिसे तव सुंदर राजस
लागति नजरा तुजवर लोभस
विशाल जनसागरी.

संभाषणि तव झरे चातुरी
चमकति नयनें करित मस्करी
प्रशांत वदनी स्मितलवल-हरी
दर्शनि मधुमाधुरी.

स्पर्शाने तव भानच हरपे
रोमांचामृत देहीं झिरपे
निरखिता तुला नेत्रीं तिरपे
ये चांदणि झिरझिरी.

तशांत दिपवी हे तव वैभव
बुजुनि जातसे माझा जीव
उसळोनि उठे मनि जाणीव
स्वप्न नव्हे ना तरी ?

लाविते तुझी प्रीती हुरहुर
भलाई तुझी असेल वरवर
सत्ता माझी नसेल तुजवर
दुसरी कोणीतरी ?

## २१

राधा मी गायिका
माधवा स्वर माझे आयका.
रियाज करिता उठुन सकाळी,
आंठी का पडते तव भाळी,
घेसि पांघरुनि पुन्हा कांबळी
प्रीतीची रीत कां ?

बैठक ठरली तरी न येशी,
नाहिं निमंत्रण म्हणुनिहि रुसशी,
कधि तानेला टाळि न देशी
गांठ कशी अरसिका.

स्वरमुद्रण आकाशी वाणी
करिल कधी म्हणुनी गाऱ्हाणी
गाते परि ऐकिली न कोणी
जीवन शोकान्तिका.

देशी ताकिद वर्ग घरि नको,
गाणारी कां केलि बायको,
हिरमुसली ती जगो वा सुको
जीवनपट हा फिका.

नांदीची जाहली भैरवी,
कशास सांगशि तुझी थोरवी,
रुदनाचे स्वर तुज न ऐकवी
रुध्दकंठ राधिका.

## २२

राधा ही सुगरण
जपतसे माधवासि आपण.

कचेरींतुनी येता श्रमुनी,
पुढे चहाचा पेला भरुनी,
चव घेता दिव्य ये कळोनी
गतजन्मीचे कां ऋण ?

वरणाची कधि डाळ शिजे नच
भाजीमध्ये निवडहि रोजच,
भाताची दातांशी कचकच
दह्यातुपाची चणचण.

बहुविध धार्मिक किति येती सण,
करिति मुलें गोडाची भुणभुण,
मिळतसे तयां माजविता रण
केळ्याची की शिकरण.

नसे थालिपिट नसे ओतपिट,
धम्मक पोरां मिळे मारपिट,
मुबलक मिळती पोळ्या चापट
दशा तयांची दारुण !

या सर्वांवरि आता कहर,
मासिक वाचुनि येई लहर,
फोलपटी पक्वान्ना बहर
देवाहातीं रक्षण !

## २३

राधेचे इंजिन
नेतसे माधवास ओढुन !

होत राखत्याची किर्र शिटी,
डोळे दाखवि हिरवी दिवटी,
हाताची मग चाकास मिठी
सळसळते नागिण !

मैल शेकडो मागे पडती,
अंधाराची तिज नच गणती,
किरण रुळांवर चमकत पडती
वाऱ्याची वैरिण !

धुरकट गर्वा उसळित जाई,
क्षितिज धूसरी विसळित येई,
विगत अनागत मिसळित खाई
स्थळकाळां वेसण.

कोठे जाणे ? कुठे थांबणे ?
रुळावल्या मार्गात धावणे
अगतिकता माधवी झाकणे
घण घेई ऐरण !

इंजिन केव्हा तरी सुटेल
तुटेल सांधा ! थंडावेल !
गाडी जाउन कुठे पडेल
चिन्ता ही भीषण.

राधा मी गृहिणी
माधव तव अनुचित करणी.

मुले वाढती वळण तयांना,
तुझ्या वर्तनें लागावे ना,
उगाच जमवुनि कुणा जनांना
अशी कशी खेळणी?

कुटाळकीच्या गप्पा कसल्या,
सरसावत जिव्हा वखवखल्या,
धुंडुनि फुंकिति गटारगल्ल्या
असभ्य किति बोलणीं.

देवधर्म नसला तरी नसो,
गीता भारत पठणात नसो,
आळवितां परि बुद्धि ना फसो
अचकट ती लावणी.

असे छाकटे घालुनि कपडे,
छाप कशाची कुणावर पडे,
हांसति मागें म्हणती वेडे
कसली ही पेरणी?

सावित्रीपूजनीं मागती,
ललना प्रेमें पुन्हा निज पती,
सर्वजणी मजसि हेटाळती
सोसत ना हांसणी.

राधेला ना उणे
माधवा समृद्ध भासे जिणे.

चांदीचा लखलखाट दिपला,
अत्तरांहि घमघमाट भरला,
खाण सुखाची वाण कशाला ?
उदंड खाणे पिणे.

पदोपदी गाडी न्यायाला,
क्षणोक्षणी चाकर सेवेला,
उसंत नसतां खंत कशाला
ना दुखणे खुपणे.

नाच नाटकी मन रंगेना,
देवदर्शने शांति मिळेना,
जीवनपट पळता थांबेना
पाहति सारी जणे.

नकोत वसने नको भूषणे,
व्रतवैकल्ये नच आचरणे,
नको नवससायास बोलणे
अखेरचे मागणे.

आता एकच मनचे व्हावे,
बाळ आपुल्या घरिं खेळावे,
दुसरीही करा, पण फेडावे
नेत्रांचे पारणे.

राधा चंद्रानना
माधवा वर्षी रविरश्मिना.

व्यासपीठिं बैसतां समाजीं,
मनी जाणते छायाच तुझी,
नित अभिमानीं तुझिया राजी
उधाण लहरीगणा.

तुझिया तेजें दिपता कोणी,
दुखावले मन अंतरि जाणी,
स्रवेल अमृत-वाणी राणी
ज्योत्स्नामय लेपना.

न अमावास्या सहवासाला
होत पुरेशी मला दुर्मिळा,
हर्षाची कां भेटण्या मला
पौर्णिमाच पण जनां ?

जनां जिंकुनी स्वगृही येतां,
प्रेम-सुधाकलशें तव दयिता,
देखे मधुवच-सिंचन करिता
इन्द्रधनू-विरचना.

सूर्यकान्त मी दर्शनि झरतें,
चन्द्रकान्त मणि तुला वांछिते,
इन्द्रधनूतच तव मन रमतें
हीच मनी यातना.

## २७

राधेला झाली बाधा
माधवा मांत्रिक कुणि शोधा.

अशी पांढऱ्या कशि पायाची,
केलिस पत्नी ना कामाची,
शोभा राहिलि काय घराची
संसारी भरला वांधा.

पोटि धरीना कुणि कुलदीपक,
बाइल ही कीं स्त्रीचे नाटक,
फसलास पुरा जगांत नाहक
आता तरि कंबर बांधा.

तपासण्याचे कशास नखरे,
जा आण धुपारे अंगारे,
तपासणे नशिबाचे फेरे
कायम या गाड समंधा.

डाग देउनी ठेव उपाशी
जुंपुनि बघ तिजला घाण्याशी,
फटकारुनि कर जणु नव्हतीशी
टाक तोडुनी संबंधा.

गेली तर बघुं दुसरी नवरी,
खुळ्या समजुती किति संसारी
अजाण छळिती दारोदारी
आहुति दे जीवन-समिधा.

# २८

राधा सोशित कळा
जाहलों माधव मी आंधळा.

मजसि नसे दृष्टीची सृष्टी,
तरी रहावें कां मी कष्टी,
आहे त्यांतच माझी तुष्टी
अनुभव हा आगळा !

रंगदार स्मृति काळोखांतुनि
ढंगदार या दृष्टीवांचुनि
बसतों चाखित चावुनि चावुनि;
कधि आंसू ढळढळा.

दिसति न रंभा न वा माकडें,
काय कुणाचे होत वांकडें,
देवादारी नको सांकडे
नको मना अवकळा.

दृष्टीजागी आली काठी,
मना न लागें भोगांपाठी,
लागो मजला शांतीसाठी
हरिनामाचा ळळा.

एकतारिची छेडित तार,
प्रभुनामाची संतत धार,
मनोधरेला भरला बहर
पिके सुखाचा मळा !

संतभक्त राधा
माधवा मोक्षमार्ग साधा.

गुरुबाबाची सेवा करिता,
मठात जाउनि जपास बसता,
संसाराची स्मृति ही पुसतां
मजसि ना निरोधा.

भजन पूजनी जने दंगतां,
नामश्रवणीं मनें रंगता,
अवघे अवघ्यांचेही होता
स्वार्थी नच बाधा.

मुलांची तुला कशास चिंता,
पुसूं धनाची नकोस वार्ता,
सर्व वाहिले सद्गतिपंथा
निर्वाणी सांधा.

गुरुबाबाची मजवरी कृपा,
उशीर करिता होइल खप्पा;
मोजवेल ना जगिच्या मापा
मिळता सद्बोधा.

भटकु नको, ही रजनी काळी,
जातें; येइन उद्या सकाळी,
ठेवि करुनिया तयार थाळी
सेवेत न वांधा.

## ३०

राधा ही थकणार
माधवा किति आता जपणार ?

तपे लोटिली संसाराची,
पिलांस लाभत मोठ्या चोची,
घांस भरवुनी आता त्यांची
भूक कशी भागणार ?

गत जीवन पसरिंते चित्रपट,
कोठे चुटपुट कधि वा कटकट
अंती सुचवित ताटातूट
नाहीं ती चुकणार

कांहि पाहिले कांहि राहिले,
कांहि साहिले कांहि दाहिले,
कांहि चाहिले कांहि वाहिले
कोणासी सांगणार ?

केलें ते ते तुझ्याच साठी,
उभी राहिलें तुझ्याच पाठी,
पुन्हा येऊं दे तुझ्याच गाठीं
वर मी हा मागणार.

आस दुजी जीवनात नुरली,
भोगायाची हौसहि फिटली,
सेवेची तव ओढ राहिली
म्हणुनि पुन्हा जन्मणार.

## उपसंहार

विशाल जीवन किती
वादळी उसळे नित भरती.

कोठे दोघे सुखे नांदती,
भाकरीस वा कोठे भ्रान्ती,
कोठे हरवुन बसती शांती
राधा माधव दंपती.

प्रकाश मार्गी कधी दिसेना,
कोणा मार्गचि मुळि उमगेना,
लाटा धडकुन उडविति दैना
राधा माधव त्रासती.

नोकरी नसे म्हणुनि फिकीर,
नोकरीमुळे कुठे जिकीर,
संसारांतचि कुणी फकीर
राधा माधव झगडती.

मर्म खरे संसार–सुखाचे,
कुठे दडविले कुणि केव्हाचे,
कसे कोठुनी हाति यायचे
राधा माधव शोधती.

संसाराचे समुद्रमंथन
त्यांतच चमके सुधा–भाजन
ध्यावया निघा श्रध्दा बांधुन
राधा माधव संगती !

# एक हृद्य आविष्कार !

राधा आणि माधव या पौराणिक पात्रांच्या द्वारा प्रणयभाव रंगविण्यात कवी नेहमींच रममाण होत आले आहेत. राधा-माधव हे सनातन प्रणयी युगुल आहे. जयदेवाचे गीतगोविंद हे संस्कृत काव्य राधामाधवांच्या भावना आळवीत असले तरी कवीच्या प्रणयभावनेचा विलास त्यांतून झिरपत नसावा असें निक्षून सांगतां येणार नाहीं. भक्तिगीतें गाणाऱ्या संतकवींनीहि राधाकृष्णाच्या प्रेमलीला मोठ्या कौतुकानें नव्हे, जिव्हाळ्यानें गायिल्या आहेत—

१ ) कृष्णा माझा पदर धरू नको, सोड.

२ ) तुझ्या बालमुकुंदे अजि बाई दैना केली.

३ ) मशि बोलु नको रे गोविंदा, मला आला तुझा राग.

अशी कितीक पदे संत कवींनी लिहिली आहेत. लटका राग, सलगी, धमकावणी, अशा रंगढंगांची हीं पदें असली तरी या सर्वांच्या पोटी कृष्णानें गोपीशीं केलेल्या चेष्टांत प्रणयाच्या छटाच अनुस्यूत असलेल्या दिसतात. गीतांच्या शेवटीं—

एका जनार्दनी म्हणे मनमोहन
नाम तुझे बहु गोड

अशा धर्तीचा भावभक्तीचा शिक्कामोर्तब केला की प्रणयलीला वर्णन केलेल्या दोषांचे परिमार्जन होत असावे असे म्हणण्याचा मोह होतो. केशवसुतादि आधुनिक कवींच्या समकालीनांतही प्रेमकवितेसाठीं राधामाधवांना पुढें करायचा परिपाठ रूढ होता. पण त्यानंतर मात्र या गोकुळवासियांच्या आडून प्रणयभावना आळविण्याचा प्रघात त्याज्य ठरला. कवी स्वानुभव प्रत्यक्षच मांडूं लागले.

श्री. वेलणकरांच्या ह्या कवितांत राधामाधव यांचा नांवापुरताच संबंध आहे; आणि प्रेमगीतें गायची हा उद्देशही नाहीं. नांवें पौराणिक असली तरी विषय सामाजिक आहे. ‘ चला पाहुं या घरोघरीं ! राधा माधव संसारी ’ असें त्यांनी उपन्यासांतच सांगून टाकलें आहे. आजच्या जमान्यांतील सामान्यांचे संसारी जीवन सांगण्याच्या हेतूने ते उद्युक्त झाले आहेत. हा माधव कुठे एक साधा शेतकरी तर दुसऱ्या एका गीतांत विसाव्या शतकांतला एक शिपाई गडी आहे. सामान्यांच्याहि विचारांत—

पडो कुठेंही देह आमुचा
राहिल तेथें भारत साचा
दाह करुनिया रिपु-धरणीचा

असा स्फुल्लिंग धगधगत असलेला आढळतो. हाच माधव कुठें संपादक म्हणून बोलतो आहे, तर कुठें वाणी होऊन कुरकुर करतो आहे. तीच तऱ्हा राधेची. सहचरी, विद्यार्थिनी, माता, नटी, परिचारिका, गायिका अशा भिन्न भिन्न भूमिका राधेने घेतलेल्या आहेत. इतकेंच काय पण एका कवनांत ती ' इंजिन ' होऊन आली आहे ! ( रथ आणि सारथि हा पौराणिक थाट कशाला ! ) अर्थात् संसारांत उत्पन्न होणारा विसंवाद, अनुनय, थिल्लरपणा, लंपटपणा; त्याचबरोबर पतिपरायणता, गृहिणीची, मातेची--कर्तव्यनिष्ठा अशा विविध विलासांना ह्या कवनांतून वाव मिळाला आहे. त्या त्या भावनेशी सुसंगत अशा कधी मधुर भावना तर कधी उदास विचार, केविलवाणेपणा, असहायता इत्यादींचा गोफ गुंफलेला आढळतो.

पुष्कळशी कवने म्हणजे संसृतिटीका आहे. अर्थात टीका उभयार्थी असून ती रोखठोक आहे तशी उपहासप्रचुरही आहे. एक राधा—

" विवाह म्हणजे नव्हे शृंखला '
' मातृत्वाची मज न थोरवी '

अशी अविवेकी बंडखोरी प्रतिपादते तर दुसरी राधा मातृपद प्राप्त झाल्यावर

' प्रणयाची स्वप्नें जरि लोभस
फळें न का हीं जागृत गोंडस '

अशी पतीची समजूत घालते. एका छाकट्या उडाणटप्पू माधवाला त्याची राधा भीडभाड न ठेवता सांगून टाकते कीं—

' सावित्री पूजनी मागती
ललना प्रेमे पुन्हा निज पती
सर्वजणी मजसि हेटाळती
सोसत ना हांसणी '

पण याच्याच जोडीला—

' आस दुजी जीवनांत नुरली
भोगायाची हौसहि फिटली
सेवेची तव ओढ राहिली
म्हणुनि पुन्हा जन्मणार '

असेही म्हणणारी एक अनन्य, पतिपरायण सती राधा उभी ठाकते.

| | | |
|---|---|---|
| राधा ही दुर्बळ | ( गीतक्रमांक | ८ ) |
| राधा ही तापट | ( ,, | ७ ) |
| राधा ही सहचरी | ( ,, | १६ ) |
| राधा नच आचरी | ( ,, | ) |
| माधवा विसरुन निज पायरी | ( गीतक्रमांक | २० ) |
| राधा चंद्रानना | ( ,, | २६ ) |
| राधा ही थकणार | ( ,, | ३० ) |

ही कवनें करुण रम्यतेने व भावविवशतेने ग्रंथाची माधुरी सिद्ध करणारी आहेत. उपसंहार म्हणून जे शेवटचें कवन आहे ते वाचकाला विषण्ण करणारें आहे.

श्री. वेलणकर यांची संस्कृत साहित्य-निर्मिती विशेष उल्लेखनीय आहे; रसिकांनी तिचें कौतुक केलें आहे. आतां विशिष्ट उद्दिष्टाने त्यांनी गुंफलेली ही मराठी राधामाधव कवनमालिका एक हृद्य आविष्कार आहे—श्रेयसाधनांत निश्चित मौलिक भर घालणारा आविष्कार आहे.

पुणे,
दि. ७ ऑगस्ट १९७०. **यशवन्त दि. पेण्ढरकर.**

# विनोदी म्हणून चटकदार

महाराष्ट्रांतील विख्यात संस्कृत कवि श्री. श्री. भि. वेलणकर यांचे राधामाधव हें पहिलेंच मराठी काव्य वाचकांपुढे येत आहे. गेली दोन तपे गीर्वाणवाणीच्या उपासनेंत त्यांनी घालविलेली असून, त्या भाषेंत काव्यनाटकादि विविध रचना केलेली आहे. इतकी विपुल आणि पुन्हा सरस रचना संस्कृतसारख्या प्रचारांत नसलेल्या भाषेंत करणारा त्यांच्यासारखा सिद्धहस्त कवि महाराष्ट्रात बहुधा दुसरा आढळणार नाही. त्यांची संस्कृत नाटकें रंगभूमीवर आणि आकाशवाणीवर आलेली असून तीं लोकप्रियही झालेलीं आहेत.

श्री. वेलणकर यांच्यासारख्या प्रथितयश संस्कृत कवीने आतां पन्नाशी उलटल्यावर मराठी काव्यरचनेकडे वळावे आणि तोहि पुनः अंशतः विनोदी आणि अंशतः विडंबक स्वरूपाची रचना करावी, याचे मला नवल वाटले. या काव्यासाठी त्यांनी विषय निवडला तो देखील असा की त्या विषयावर संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांत किंबहुना सर्वच भारतीय भाषांत अत्यंत रसमधुर काव्यें झालेली आहेत. व या विषयावरील नाटकेहि मराठी रंगभूमीवर आलेलीं आहेत.

आपल्या देशांतील लाखो भाविकांच्या भजनपूजनाचा आणि काव्यरचनेचा विषय होऊन बसलेल्या राधामाधवांच्या प्रणयजीवनावर " चला पाहु या घरोघरी । राधामाधव संसारी ! " अशा कल्पनेने हे विनोदी काव्य श्री. वेलणकर यांनी लिहिलेले आहे. आणि तेही आधुनिक पदांच्या चालीत. " राधा तू गवळण ", " तू राधा विरहिणी " " राधा तू हांसरी " " राधा मी संशयी " अशीं कांही पदें हृदयंगम आहेत तर " राधा तू नाचरी " " राधा मी नवनटी " " राधा लख धार " " राधेचे इंजिन " अशीं कांहीं पदें विनोदी म्हणून चटकदार आहेत.

आपल्या समाजाच्या सध्याच्या संक्रमणावस्थेत विशेषतः स्त्रिया या निरनिराळ्या नोकरीधंद्यात शिरल्यापासून अनेक प्रकारची चमत्कारिक गुंतागुंत संसारांत उत्पन्न झालेली आहे. ती या पदांतून श्री० वेलणकर यांनी रेखाटली आहे. त्यामुळे हे काव्य गमतीदार वाटते पण राधामाधवासारखे आपल्या देशातील लाखो लोकांच्या भजनात असलेले नाव या काव्याला न देतां दुसरें एकादें आकर्षक नाव जर त्यांनी दिले असते तर ते समर्पक झाले असते असे मला वाटते. या काव्याचे रसिक वाचक कुतूहलाने स्वागत करतील अशी मला उमेद वाटते

नागपूर, ग. त्र्यं. माडखोलकर

दि. १० ऑगस्ट १९७०

# स्वातंत्र्य काळातील संसारदर्शन

संस्कृतमध्यें 'सौभद्राचें' ज्या श्री. श्री. भि. वेलणकर यांनी भाषांतर केले 'त्यांनीच आधुनिक कांही संसार पाहिले;' विशेषतः त्यांनी आधुनिक वावरणाऱ्या 'माधव व राधा' यांच्या वृत्ती पाहिल्या व त्यावर विनोदानें लिहिलें. त्यांत "राधा मी नवनटी' माधवा घालु नको या अटी" या सुरावर मराठी काव्य लिहलें. टीकेपेक्षां यांत सोय आहे. त्यानें कवीला बदनाम होण्याची भीती नाहीं. त्यांच्या संसारांतील कित्येक गोष्टींचा पसारा वर्णन करतांना "चहा, सिनेमा, तेल पावडर, काळा दर लावतां (काळा बाजार) किंवा एंजिन" हे शब्द आले आहेत. त्यावर अभिप्राय द्यावयाचा म्हणजे 'ही स्वातंत्र्याच्या काळांतील लेखकाची कमाई आहे व ती परिस्थितीशीं अगदी अनुकूल आहे'.

या काव्याला सुरुवात त्यांनी 'राधा तूं गवळण' अशी केली आहे. कविता अत्यंत सभ्य व सुरेख लिहली आहे व विनोद त्यांनी खेळवला आहे. त्यांत राधा कशी आहे त्याचें वर्णन आहे. त्यांत 'राधा तूं हांसरी' 'राधा तूं नाचरी' 'राधा मी नवनटी' इत्यादि राधेच्या स्वभावाचीं विविध चित्रें देऊन 'विशाल जीवन किती । वादळी उसळे नित भारती' अशी सुरुवात विस्तृतपणें झाली आहे.

एकदां तर "राधा ही तापट
माधवा फारच तूं लंपट
पत्नीला कां शरीर केवळ
कां न मनि तुझ्या प्रीती निर्मळ
दुरून दिसुं दे दर्शन प्रेमळ
तेंच तुला दुर्घट"

यावरून कल्पना येईल. आधुनिक लेखक–लेखिका जसे वळण देतील तसें तें येईल! लेखक जीवनाशी फार प्रामाणिक आहेत.

हें स्वातंत्र्यकाळांतील स्वरूपदर्शन आहे! गेल्या पंचवीस वर्षांतील काळाची ही कमाई आहे!! स्वातंत्र्याचें हें पारितोषिक दुर्दैवी आहे पण तें सुंदर भाषेंत व सुबक पद्यांत गुंफलें आहे.

११-८-७०
सांगली

शं. के. कानेटकर
(गिरीश)

★

## परिशिष्ट १

### कडव्याचा चौथा चरण

एकंदर असे चौथे चरण या संग्रहांत १६० आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दहा सशब्द मात्रांचे चौथे चरण पुढील गीतांत आहेत– | | | | ५, ६, १०, ११, १२, १३, १४, २९, |
| अकरा | ” | ” | ” | ३, ४, ७, ८, ९. १३ १५, १६, १७, १८, २०, २१, २३. २४, २५ २६, २८. |
| बारा | ” | ” | | ५ ३० |
| तेरा | ” | ” | | २२ |
| चौदा | ” | उपन्यास, | | १, २, १९, २२, २७. उपसंहार. |

अपवाद : १·१० चौदापैकी एक मात्रा निःशब्द ठेवली आहे, जणु स्वल्पविरामच.
२·२२ चौदापैकीं एक मात्रा निःशब्द.

५ प्रत्यक्ष अक्षरें बारा सशब्द मात्रांची; पण पहिले दोन ताल चार मात्रांचे असले तरी म्हणण्याच्या लकवीला सशब्द मात्रा पांच जसें :– प्रेमीं न । मी चोर । टी. असेंच या गीताच्या सर्व चौथ्या चरणांसंबधी ( ६, १०, १४, १८, २२ ) समजावें.

१२ येथे चरण ६, १४, १८ हे सशब्द दहा मात्रांचे आहेत पण चरण १० व २२ हे ( Force ) जोर दाखविण्याकरितां ११ सशब्द मात्रांचे आहेत.

१३ चरण ६ व १० सशब्द दहा मात्रांचे.
चरण १४. १८, २२ अकरा मात्रांचे.
फरक कां हें योग्य आवाजांत म्हटलें कीं अर्थानें लक्षात यावें.

१६ चरण ६ मध्ये सशब्द मात्रा दहाच.

२५ चरण १० मध्ये सशब्द मात्रा दहाच.

३० या गीतांत चौथा चरण म्हणतांना शेवटचा र हा सशब्द मात्रांत येणार नाही अशा लकवीनें म्हणायचा. त्या करितां आधी एक निःशब्द मात्रा ( ६ व्या मात्रेनंतर ) म्हणावी.

उपसंहार- राधामाधव या शब्दांनंतर एक विरामवजा निःशब्द मात्रा प्रत्येक चौथ्या ओळींत गृहीत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
ग्रंथांक ......... विः ...काव्य
क्रमांक ...१८६५... नोंद दिः ...


## परिशिष्ट २

### टीपा

२-२२ चांदणी-आपण चांदणी होऊन प्रियेला हंसून दाखवूं ही सैनिकाची कल्पना.

४-१४ चूर–दोन्ही अर्थ उघड आहेत.

९ या गीतामध्यें राधा विवाहित नाहीं हे उघड आहे. माधव अजून कल्पनेंत आहे.

१२-१० अव्ययी – ( १ ) हां, हो, अशा प्रकारची एकाक्षरी वा एक तुटक शब्दाची उत्तरें–अव्यय वाचक

( २ ) शब्द खर्च न होईल अशीं

१४-२ निर्माता – ( १ ) पिता

( २ ) निर् – माता = माता नव्हे

१८ राधा अर्थातच विवाहित नाही पण माधव घोटाळतो आहे.

१९-१४ उगराणी = उधारीची वसुली

२३. ३ किर्र शिटी – प्रतीक – मंगळाष्टकें

४ हिरवी दिवटी – " – हिरवी साडी

५ चाकास – ( १ ) ड्रायव्हरच्या चाकास

( २ ) संसार – चक्रास

६ सळसळते नागिण (१) लोकांच्या खोंचक व बोंचक वृत्ती – वचनांमुळें

(२) आगगाडीचें धांवणें

९ मधूनच मार्ग दिसतो संसारांत !

११ स्वतःच्या कर्तृत्वाचा गर्व – आपल्यामुळें संसाराचा गाडा पुढें जातो आहे. अशीही परिस्थिती असते.

१२ दुरून अस्पष्ट दिसणारे भविष्य जवळ येत येत स्पष्ट स्वच्छ दृश्यमान होतें.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७८८५

१३ भूत आणि भविष्य यांच्या वैचारिक मिश्रणांतून जीवनाचे वर्तमान मनुष्य निर्मित असतो.

१४ आपण स्थळ आणि काळ याना घटितात आपल्या मनाप्रमाणें वाकवितो, राबवितो असा भास अधून मधून कर्तृत्ववंताला होत असतो.

१८ रुळावल्या — रुळलेल्या ( चाकोरीचा )

— रुळांचा

२६. ६ सूर्यकिरण चंद्रावर पडतात. चंद्र लहरीनां उधाण आणतो

१७-२० अमावास्येलाच सूर्य चंद्र भेटतात — चंद्र अदृश्य होऊन. लोकाना चंद्रदर्शनाला पौर्णिमाच आवडते — सूर्याच्या गैरहजेरीत.

२२-२४ समोरच्या सूर्याचे किरण आपल्या डोळयातल्या प्रेमाच्या पाण्यातून इन्द्रधनुषी वाटतात.

२५ सूर्यकांत — सूर्यकिरणांनी द्रवणारा पाषाण — एक रत्न

२६ चन्द्रकान्त — चन्द्र " " रत्नपाषाण

२७ इन्द्रधनु — जगातील विविधता जी सूर्य पहात असतो.

या खेरीज स्मरणी ( २. १४ ) झरते ( २६.१९ ) वगैरे इतर ठिकाणचे द्व्यर्थ रसिकांनी समजून घ्यावे.

...ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम.......................... दि: ......................
क्रमांक .......................... नों० दि: ....................
REFBK-0017976
REFBK-0017976
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८८८५

# वेलणकर-वाङ्मय

## संस्कृत

### ( प्रकाशित )

| | | | |
|---|---|---|---|
| १. विष्णुवर्धापनं | [ खण्डकाव्य ] | १९५७ | शिल्लक नाहीं |
| २. गुरुवर्धापनं | [ ,, ] | १९५३ | ,, |
| ३. जयमङ्गला | [ ,, अनुवाद ] | १९५९ | ,, |
| ४. जीवनसागरः | [ ,, ] | १९६० | रु. २. |
| ५. संगीत–सौभद्रम् | [ नाटक, अनुवाद ] | १९६१ | शिल्लक नाहीं |
| ६. कालिदासचरितं | [ नाटक ] | १९६१ | रु. ३ |
| ७. कालिन्दी ( नाटक ) <br> ८. कैलासकम्पः ( गीतनभोनाट्य ) <br> ९. स्वातन्त्र्यलक्ष्मीः ( नभोनाट्य ) | } रणश्रीरङ्गः | १९६४ | रु. ५ |
| १० हुतात्मा दधीचिः ( गीतनभोनाट्य ) <br> ११ राज्ञी दुर्गावती ( नभोनाट्य ) | } प्राणाहुती | १९६५ | रु. २ |
| १२ जवाहरचिन्तनम् ( काव्य ) <br> ( with forewords by Dr. Radhakrishnan and Dr. C. D. Deshmukh ) | | १९६६ | रु. ७ |
| १३ विरहलहरी | [ खण्डकाव्य ] | १९६७ | रु. २ |
| १४ मेघदूतोत्तरम् <br> [ with a note on the route of मेघ with a map ] | [ गीतनाट्य ] | १९६८ | रु. २-५० |
| १५ स्वातन्त्र्यचिन्ता [ गीतनाट्य ] <br> १६ स्वातन्त्र्यमणिः [ नभोनाट्य ] | } स्वातन्त्र्यचिन्तामणी | | रु. १-५० |
| १७ गीतगीर्वाणम् | [ संस्कृत संगीत ] | | रु. ५ |

### ( अप्रकाशित )

१ मध्यमपाण्डव ( नभोनाट्य )
२ जन्म रामायणस्य ( बालनाट्य )
३ नागार्जुनीयम् ( बालनाट्य )
४ पूर्वमेघीयं ( गीतनाट्य )
५ मराठी-काव्य-दर्शनं ( काव्यानुवाद )
६ यां चिन्तयामि ( नाटक )
७ अहोरात्रं ( खण्डकाव्य )
८ गीर्वाणसुधा ( स्फुटकाव्य )

# वेलणकर-वाङ्मय

## मराठी

### ( प्रकाशित )

राधामाधव-( खण्डकाव्य )-१९७० रु. ३
(श्री. वि. स. खांडेकर, महाराष्ट्रकवी यशवंत व, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर व कवि गिरीश यांचे अभिप्राय )

### ( अप्रकाशित )

१. श्रीरामसुधा ( काव्यसंग्रह )
२. जनतेचे दास जसे ( नाटक )
३. कला लहरी निमाली ( नाटक )
४. पैठणचा नाथ ( नाटक )
५. मदिराक्षी ( नाटक )
६. असें कसें झालें ? ( नाटक )
७. कल्याणी ( नाटक )
८. रेवती ( कथा )
९. विद्येचें हें पावन मंदिर ( नाटक )

## इंग्रजी

### ( प्रकाशित )

Śimiles in Rigveda ( जर्मनमधून अनुवादित ) १९३७-३८

### ( अप्रकाशित )

Contract Bridge
Indian Womanhood

## हिंदी

### ( अप्रकाशित )

पैठणके नाथ ( नभोनाट्य ) आकाशवाणी दिल्ली १९६४

---


**राजीवश्री प्रकाशन**

आगामी आकर्षण

**रे व ती**

लेखक : **श्री. भि. वेलणकर**